# महाप्रिंट एक्स्पो

जळगाव दि. 9 - खान्देशच्या इतिहासात प्रथमच मुद्रण तंत्रज्ञानाचे अतिशय वैविध्यपूर्ण, जागतिक दर्जाचे अशा ‘महाप्रिंट एक्स्पो‘ या प्रदर्शनाचा समारोप आज दि.9 रोजी झाला. तीन दिवसात 12 जिल्हयातून आठशे पेक्षा जास्त मुद्रक व्यावसायिक , विदयार्थी व नागरिकांनी भेट दिली. प्रगत तंत्रज्ञानाची माहिती घेत विविध साधनांविषयी माहिती जाणून घेतली.

केसीई सोसायटीच्या अमृत महोत्सवानिमित्त मू.जे. महाविदयालय, महाराष्ट्र मुद्रण परिषद, स्पार्क इन्स्टीटयुट आॅफ मल्टिमीडिया आणि प्रिंटींग टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विदयमाने आयोजीत तीन दिवसीय ‘महाप्रिंट एक्स्पो‘ प्रदर्शनाच्या तिस-या दिवशी सकाळी 9 वाजल्यापासून प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी सुरू होती. प्रदर्शनामध्ये मुद्रण परिषदेचे पदाधिकारी आणि स्टॉलधारक मुद्रण व्यावसायिक व विदयार्थ्यांना माहिती देत होते. नवीन तंत्रज्ञान अवगत झाले, मूद्रणाबाबत असणारे गैरसमज दूर झाले अशा प्रतिक्रिया भेट देणा-यांनी व्यक्त केल्या.

सोमवारी संस्थाध्यक्ष नंदकुमार बेंडाळे, प्राचार्य डॉ.उदय कुलकर्णी यांनी प्रदर्शनाची पाहणी करून प्रदर्शनातील सहभागींचे स्वागत केले. संस्थाध्यक्ष बेंडाळे यांनी प्रदर्शनामध्ये 10 लाख ते 10 करोड रूपयांपर्यंतच्या मशिनरी व्यावसायिकांना पाहण्यास उपलब्ध झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

पूर्ण तीन दिवस प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी मुद्रण परिषदेसाठी बाळासाहेब आंबेकर, उपाध्यक्ष बाळकृष्ण वाणी, समन्वयक तुषार धोटे, स्पार्क इन्स्टिटयुटच्या समन्वयिका साधना थत्ते, प्राचार्य अविनाश काटे, डी.डी. झोपे, अभिजित महाजन यांच्यासह करीष्मा टापरे, प्रिया बोर्डे, अंजिक्य कुलकर्णी, तृप्ती चव्हाण, अमोल पगारे, गजानन कुंभार, किरण पाटील, कल्पेश महाजन, भटू जोशी, तेजस्विनी पाटील, दिपक बाविस्कर, परमेश्वर थाटे, संदीप माळी, गोपाळ मराठे आदींसह ओजस्विनी कला महाविदयालय, आयएमआर महाविदयालयाच्या विदयार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**From,**
**Parmeshwar Thate**
Kekatnibhora  Tal: Jamner
Dist  : Jalgaon
Mob: 9637822513, 9922761401 (Whatsapp)
Blogger : http://shivashriparmeshwarthate.blogspot.in/

http://sangnakvishwa.blogspot.in/